CCPS — Center for Chemical Process Safety — An AIChE Technology Alliance
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
**Messages for Manufacturing Personnel**

This issue sponsored by DEKRA
On the safe side.
www.dekra.us/process-safety

# जबरदस्त ताकत असलेला एक छोटासा शब्द - विचारा

**फेब्रुवारी २०२०**

“मला वाटते हा व्हॉल्व्ह योग्य आहे - कदाचित हे माझ्या वरिष्ठ ऑपरेटरला विचारणे योग्य होईल. नको तो व्यस्त असेल. पण मला खात्री आहे की हे बरोबर आहे"

“मला खात्री आहे की मी केलेले कॅल्क्युलेशन बरोबर आहे, परंतु जर मी याबद्दल विचारले तर मी मूर्ख ठरेन. त्यापेक्षा मी घेतलेल्या निर्णयाबरोबर जाईन”

“या इन्स्ट्रुमेंटवरील असलेला आय डी क्रमांक वाचणे म्हणजे खूपच कठीण काम आहे, परंतु तो नक्कीच बरोबर असेल. मी त्यास कॅलिब्रेशन साठी ऑफ लाईन घेईन, जर तो चुकीचा असेल तर ते मला पॅनेल ऑपरेटर सांगेल"




आपण काय विचार करतो आणि आपण काय जाणतो? यामध्ये काय फरक आहे - खूपच ! आपण जे करतो ते आपल्या अनुभवावर आधारित आहे. (चांगले किंवा वाईट) आणि जे बरोबर असल्याचे आठवते. त्यामुळे आपल्याकडून चुका होण्याच्या वाजवी शक्यता असु शकतात. एखादी गोष्ट जाणून घेण्याचा अर्थ अचूक माहिती आणि कार्यपद्धतींवर काय योग्य आहे हे ठरविण्यानुसार कार्य करणे परंतु अंदाज करणे किंवा गृहीत धरणे यावर नाही. एखादे कार्य करतेवेळी, त्यामधील अपसेट्स, गळती होणे किंवा एखादी दुर्घटना होण्याऐवजी त्या कार्यास उशीर झालेला बरा तसेच ते कार्य करण्यासाठी उचित काय आहे त्याची पुष्टी करणे यथार्थ ठरेल.

सी एस बी ने एका आग दुर्घटनेचे विश्लेषण (अहवाल क्र. २०१६-०२-आय-येल आणि व्हिडीओ) करतेवेळी म्हटले आहे की व्हॉल्व्ह दुरुस्त करतेवेळी आयसोबुटिलिनची गळती झाली त्याचे कारण म्हणजे त्या व्हॉल्व्ह संधर्भात असलेली अपुरी माहिती तसेच सांभाव्य धोक्यांचा विचार केलेला नव्हता. थोडक्यात ऑपरेटर ला माहीत नव्हते.

## तुम्हांला माहीत आहे का?

- केमिकल ऑपरेशनसाठी उच्च पदविकेची शिस्त आवश्यक असते - प्रत्येक वेळी योग्य काम योग्य मार्गाने करणे.
- कारखान्यातील उद्योग मूलभूत नियंत्रण प्रणाली कडे गेला आहे पण त्याहीपेक्षा लोक कश्याप्रकारे कार्य करतात हे माहित असणे खूप महत्वाचे आहे.
- आपण काय काम करता हे महत्वाचे नाही ते योग्य रित्या करणे महत्वाचे आहे. काही चुका इतरांपेक्षा शोधण्यायोग्य असतात. जर एखाद्या त्रुटी मध्ये कमी स्पष्टता दिसल्यास किंवा कोणतेही दुष्परिणाम न दिसल्यास त्याचे परिणाम निरीक्षणांमधून किंवा प्रोसेस विचलनामधून त्यामध्ये थोडा वेळ जाऊ शकेल.

## तुम्ही काय करू शकता?

- जर आपल्याला माहित नसेल आणि शंका असल्यास, फक्त विचारा! एखादा अपघात होण्यापेक्षा आपण शंका विचारणे चांगले जरी त्यामधून आपले अज्ञान दिसले तरी चालेल. आपण विचारलेल्या समस्येमधून त्याचा प्रशिक्षणासाठी तसेच पुनर्मुल्यांकनासाठी तसेच आपल्या प्रश्नांचे परीक्षण करून इतरांना त्याचा फायदा होतो
- आपल्या कामासंदर्भात असलेल्या सर्व प्रक्रियांबाबत स्वतःस माहिती करून ठेवा. जर आपल्याला विरोधाभास दिसल्यास वरील मुद्दा लक्षात ठेवा.
- आपण कोठे चुकतो याकडे लक्ष देणाऱ्या लोकांचा आदर करा. ती एक प्रकारची मदत आहे अपमान नाही! ज्यावेळी आपण दुसऱ्यांच्या चुका पाहतो त्यांना विचार कि ते कार्य बरोबर करताहेत का?

***असा एकच वाह्यात प्रश्न असू शकतो, जो विचारला गेला नाही.***

©AIChE 2020. All rights reserved. Reproduction for non-commercial, educational purposes is encouraged. However, reproduction for any commercial purpose without express written consent of AIChE is strictly prohibited. Contact us at ccps_beacon@aiche.org or 646-495-1371.

**Translated into Marathi by Mallikarjun V Malgatte, Head – EHS, Gharda Chemicals Limited, Lote Parshuram, Maharashtra (India)**